55

क्र.कक्ष-1/पुरवठा/अका/कावि/ /2015
जिल्हाधिकारी गोंदिया यांचे कार्यालय,
दिनांक 03 फेब्रुवारी,2015

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

खाजगी /संस्थेचे गोदाम भाडयाने घेण्याबाबत.

## जाहिरात सूचना

गोंदिया जिल्हयातील **खरीप पणन** हंगाम २०१२-१३ मधील धानाची भरडाई केलेला सी.एम.आर.तांदुळ जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या ताब्यात साठवणुक करून ठेवण्याचे, शासन परीपत्रक क्रमांक-खरेदी-१०१४/प्र.क्र.५५/नापू-२९ दि.२३जानेवारी,२०१५ **चे आदेश** आहेत. त्यामध्ये आवश्यकतेनुसार खाजगी /संस्थेचे गोदाम, भाडयाने घेण्याचे शासन आदेश आहेत.

त्यानुसार गोंदिया जिल्हयात, जिल्हाधिकारी ,गोंदिया यांना सी.एम.आर.तांदुळाच्या साठवणूकीकरिता १०,००० मेट्रिक टन क्षमतेचे गोदामे भाडयाने घेणे **आवश्यक** आहे. गोदामे ही एकाच परिसरामध्ये असावे. **गोदाम** भाडे हे **कार्यकारी** अभियंता ,सार्वजनिक बांधकाम विभाग, यांनी ठरवून दिलेले दरानुसार लागू राहतील, या सर्व बाबीस अनुसरुन अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज **दिनांक 18 फेब्रुवारी , 2015** ला 2.00 वाजेपर्यंत जिल्हा पुरवठा **अधिकारी,** गोंदिया यांचे कार्यालयात ( कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन ) सादर करावे.

सर्व माहिती, अर्जाचा नमुना, जाहिरात,अटी व शर्ती जिल्हाधिकारी गोंदिया यांचे संकेत स्थळ gondia. nic. in वर , उपलब्ध आहे. **दिनांक 18 फेब्रुवारी , 2015** ला 2.00 वाजे नंतर प्राप्त होणारे व अपूर्ण अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

जिल्हाधिकारी
गोंदिया

114 Grahak P

# <u>अर्ज</u>

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
गोंदिया

विषय :- **<u>खाजगी /संस्थेचे गोदाम भाडयाने घेण्याबाबत.</u>**

महोदय,

जिल्हाधिकारी, कार्यालय गोंदिया यांची खाजगी /संस्थेचे गोदाम भाडयाने घेण्याबाबत जाहीरात दिनांक ------------------ रोजी -------------------------- या वर्तमान पत्रात प्रसिध्द झाली असुन त्या जाहीरातीमधील अटी व शर्ती मला /आमच्या संस्थेस मान्य असुन कार्यकारी , अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग , गोंदिया ,हे ठरवून देतील त्या दराने मी /आमची संस्था आमच्या मालकीचे / संसथेचे ---------मे. टन गोदाम तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता उपलब्ध करून देत आहो.

आपला विश्वासू

नांव व पता स्वाक्षरी

**सी.एम.आर. तांदुळ मिलर्सकडून ताब्यात घेण्याकरिता भाडयाने घेण्यात येणा-या, गोदाम भाडयाच्या जाहीरात सूचनासाठी अटी व शर्ती :-**

१. गोदामाची एकूण क्षमता १०,००० मे.टन. असणे आवश्यक आहे.

२. गोदामे ही गोंदिया जिल्हयातील असणे आवश्यक राहील.

३. सर्व गादामे हे एकाच परिसरातील असणे आवश्यक राहील.

४. गोदामे हे तीन महिन्याकरिता भाडयाने द्यावे लागेल त्यामध्ये जास्त कालावधी लागल्यास मुदतवाढ त्याच दरानुसार देणे अनिवार्य राहील. गोदाम अन्नधान्य साठवणुकीकरिता तांत्रिक दृष्टया परिपूर्ण असणे आवश्यक आहे.

५. गोदामाचे भाडे, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठरवून देतील त्या दराने देय राहील.

६. गोदामामध्ये धान्याचे ट्रकच्या वाहतूकीकरिता पक्का रस्ता असणे अनिवार्य आहे.

७. गोदामामध्ये विद्युत कनेक्शन असणे आवश्यक असून संपूर्ण गोदामात विद्युत प्रकाश असावा.

८. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे गरजेचे राहील.

९. सबधित गोदाम मालकांनी करारनामा करून गोदाम ताब्यात सोपावा लागेल.

१०. सदर गोदामाच्या जागेचा ७/१२, व नकाशाच्या सत्यप्रती व गोदाम क्षमतेचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.

११. गोदामाचे जवळपास धर्मकाटा असणे आवश्यक आहे.

१२. खाजगी व्यक्ती/ संस्थेकडून विहीत मुदतीत **अर्ज** अटी व शर्तीच्या पूर्ततेसह दिनांक १८.०२.२०१५ ला दुपारी २.०० वाजेपर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांचे कार्यालयात (कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन) सादर करावे. उशिरा प्राप्त होणा-या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

१३. गोदाम भाडयाने घेण्याचा अंतिम निर्णय जिल्हाधिकारी, यांनी राखून ठेवले आहे.

जिल्हाधिकारी,
गोंदिया करिता.